दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४६ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.६ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## भारताचा विजयी रथ रोखण्यात द.आफ्रिका अपयशी, टीम इंडियाचा दणदणीत विजय

**मुंबई । प्रतिनिधी**

आयसीसी वर्ल्ड कप २०२३ मध्ये भारत विरुद्ध साऊथ आफ्रिका यांच्यात रविवारी सामना खेळवला गेला. या सामन्यात टीम इंडियाच्या भेदक गोलंदाजांनी साऊथ आफ्रिकेच्या फलंदाजांचा धुव्वा उडवत त्यांना ८३ धावांवर ऑल आउट केले.यासह टीम इंडियाने वर्ल्ड कप २०२३ मधील सलग आठवा सामना जिंकला आहे.




कोलकाताच्या ईडन गार्डन स्टेडियमवर भारत विरुद्ध साऊथ आफ्रिका यांच्यात सामना खेळवला जात आहे. या सामन्यात रोहित शर्माने टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि साऊथ आफ्रिकेला प्रथम गोलंदाजीची आव्हान दिले. यावेळी टीम इंडियाने फलंदाजीत जबरदस्त परफॉर्मन्स दाखवून साऊथ आफ्रिके विरुद्ध ५० ओव्हरमध्ये ३२६ धावा केल्या. यात विराट कोहलीने १०१ धावा करून वनडे क्रिकेटमधील ४९ वे शतक ठोकले. यासोबत रवींद्र जडेजाने २९ बॉलमध्ये १५ धावा, सूर्यकुमार यादवने १४ बॉलमध्ये २२ धावा तर केएल राहुलने ८ धावांची खेळी केली.साऊथ आफ्रिकेने टीम इंडियाच्या ५ विकेट्स घेऊन त्यांना ३२६ धावांवर रोखले. यावेळी टीम इंडीयाने साऊथ आफ्रिकेला विजयासाठी ३२७ धावांचे मोठे आव्हान दिले. विजयाचे आव्हान पूर्ण करण्यासाठी साऊथ आफ्रिकेचे फलंदाज मैदानात उतरले परंतु टीम इंडियाच्या गोलंदाजी समोर फार काळ टिकले नाहीत. या सामन्यात टीम इंडियाच्या गोलंदाजांपैकी सर्वाधिक विकेट रवींद्र जडेजा याने काढल्या त्याने सर्वाधिक ५ विकेट्स घेतल्या. त्यामागोमाग मोहम्मद शमीने २, कुलदीप यादवने २, मोहम्मद सिराजने १ विकेट घेतली. टीम इंडियाने साऊथ आफ्रिकेचा डाव ८३ धावांमध्ये गुंडाळला आणि वर्ल्ड कप २०२३ मधील सलग आठवा विजय मिळवला.

## बाबो..! चक्क आमदारावरच मारहाणीचा गुन्हा दाखल

### ग्रामपंचायत सदस्याला मारहाण प्रकरण ;दोन पक्षातील वाद आला चव्हाट्यावर

**देवळी(वर्धा) । प्रतिनिधी**

देवळी तालुक्यातील सोनेगाव बाई येथे ग्राम पंचायत सदस्य सातव याला मारहाण केल्याप्रकरणी देवळीचे आमदार रणजित प्रताप कांबळे यांच्यावर देवळी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



भारतीय जनता पार्टीने आणलेल्या निधीचे परस्पर भूमिपूजन करण्याचा सपाटा आ. रणजित कांबळे यांनी लावला आहे.त्यात खासदारांसह निधी आणणार्या स्थानिक भाजपा पदाधिकार्यांनाही डावलेले जात असताना ३ वर्षांपूर्वी झालेल्या भूमिपूजनाचे अद्याप काम सुरू न झाल्याने देवळी तालुक्यातील सोनेगाव (बाई) येथील ग्रामपंचायत सदस्याने आ. कांबळे यांना त्या रस्त्याविषयी विचारणा केली असता त्यांनी भाजपा पुरस्कृत ग्रा पं सदस्य गणेश सातव याला मारहाण केली होती. या संदर्भात सातव यांनी देवळी पोलिस स्टेशनमध्ये ४ नोव्हेंबर रोजी तक्रार दिली असता त्यांनी गुन्हे दाखल न करता प्रकरणच चौकशीत ठेवले होते. भाजपाने काल पत्रकार परिषद घेऊन गुन्हे दाखल करा अन्यथा आम्ही पोलिस स्टेशनला घेराव घालू असा इशारा दिला होता. या संदर्भात पोलिस अधीक्षक हसन यांनाही निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर आ. कांबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, बचाव करण्यासाठी सोनेगाव बाई येथील सरपंचाने०४ नोव्हेंबर ला देवळी पोलिसात सातव याने शासकीय कामात दारू पिऊन अडथळा आणल्याची तक्रार दिली होती. मात्र, तो बचाव फोल ठरत आ. कांबळे यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. या संदर्भात ठाणेदार पिदूरकर यांच्या सोबत संपर्क केला असता गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे सांगितले.

## विदर्भस्तरीय क्रिकेट सामन्यांचे विलास नेरकर यांच्या हस्ते उद्घाटन



**वरोरा । प्रतिनिधी**

जय जिजाऊ क्रिकेट मंडळ वरोरा तर्फे खेकारे लेआऊट जिजामाता वार्ड वरोरा येथे विदर्भस्तरिय हाप पिच टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन माजी नगरसेविका मंगला पिंपळकर, उद्घाटक विलास नेरकर विधानसभा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वरोरा, प्रमुख पाहुणे म्हणून अनिल झोटींग माजी उपाध्यक्ष न.प.वरोरा , चंद्रकांत कुंभारे शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वरोरा, डॉ. नितीन पाटील अध्यक्ष जय जिजाऊ क्रिकेट मंडळ वरोरा . व अन्य मान्यवर पाहुण्यांनी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार व दीप प्रज्वलन करून क्रिकेट पिच चे रितसर रिबीन कापून उद्घाटन केले.यावेळी पाहुणे मंडळींनी क्रिकेट खेळुन आनंद घेतला. तसेच माजी नगरसेविका मंगला पिंपळकर , विलास नेरकर,चंद्रकांत कुंभारे यांनी याप्रसंगी सर्व खेळाडूंना व जनसमुदायाला मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित मांडवकर यांनी केले. या प्रसंगी वार्डातील मंडळी व बाहेर गाव वरून आलेले क्रिकेट खेळाडू व क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.

## येरखडा येथे सरपंच व ऑपरेटरला कोंडले ग्रामपंचायत कार्यालयात

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील येरखेडा येथील सरपंच संजय गेडाम व ऑपेरेटर मितेश या दोघांना ४ नोव्हेंबर रोज शनिवारी सकाळी नऊ वाजताच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालयात काम करीत असताना ग्रामपंचायतचे सदस्य सुधाकर नन्नावरे यांना कोंडल्याची घटना उघडकीस आली.सुमारे तीन तासानंतर पोलिसांनी कुलूप तोडून त्यांना बाहेर काढले. गावात एक सभागृह मंजूर असून त्या सभागृहाचे बांधकाम करू नये, अशी मागणी सदस्य करीत आहे. त्याच कारणावरून सरपंचाला कोंडल्याची माहिती समोर येत आहे.चिमूर तालुक्यातील येरखडा गावात ४ नोव्हेंबर रोज शनिवारला सकाळी सरपंच संजय गेडाम व ऑपेरेटर मितेश हे दोघेही ग्रामपंचायत कार्यालयात काम करित बसले होते. सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत सदस्य सुधाकर नन्नावरे हे कार्यालयात आले. आणि कार्यालयातून बाहेर जाताना कुलूप लावून त्यांना कोंडले.काही वेळाने माजी जिल्हा परिषद सदस्य विलास डांगे काही कामानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाकडे आले असता ग्राम पंचायत कार्यालयाला कुलूप लावलेला दिसले. ग्रामपंचायत कर्मचारी हे बाहेर बसलेला होता. याबाबत विलास डांगे यांनी सविस्तर माहिती घेतली असता सरपंच यांना आतमध्ये कोंडून ठेवले असल्याची




माहिती समोर आली. त्यांनी भिसी पोलीस स्टेशनला या घटनेची माहिती दिली.माहिती मिळताच भिसी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सचिन जंगम येरखेडा ग्रामपंचायत कार्यालयात आले. त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात पाहणी केली आणि कुलूप तोडून सरपंच आणि ऑपेरेटरला बाहेर काढले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य विलास डांगे उपस्थित होते.सरपंच गेडाम यांच्या फिर्यादीवरून ग्रामपंचायत सदस्य सुधाकर नन्नावरे यांच्याविरोधात भिसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. येरखडा गावात एक सभागृह मंजूर करण्यात आले आहे. सदर कामाचे बांधकाम सुरू करण्यात येवू नये, या मागणीसाठी सदस्याने असे केल्याची माहिती समोर आली. पुढील तपास ठाणेदार प्रकाश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे.

## गावातील कृषी सेवा केंद्र बंद

### रब्बीच्या हंगामात शेतकरी हवालदिल

**पुलगाव (वर्धा) । प्रतिनिधी**

पुलगाव कृषी व्यवसायी संघाच्या आव्हानानुसार परिसरातील सर्व कृषी सेवा केंद्र २ नोव्हेंबर पासून बंद आहे. हा बंद ४ नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे. रब्बी पिकाच्या हंगामामध्ये कृषी केंद्र बंद असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.




महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित विधेयकामधील जाचक अटी व प्रस्तावित पाच कायदे रद्द करण्यासाठी हा बंद सुरू आहे. कृषी निविष्ठा विक्री करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करणे, सध्या प्रचलित असलेले कायदे पुरेसे असतानाही राज्य शासनाकडून विधेयक क्रमांक ४०,४१, ४२,४३,४४ पुन्हा नवीन कायदे करण्याची प्रक्रिया सुरू करणे ,प्रस्तावित कायद्यातील तरतुदी विक्रीसाठी अत्यंत जाचक असुन त्यामुळे व्यवसाय करणे कठीन झाले आहे. राज्यातील विक्रेते हे कोणत्याही प्रकारच्या कृषी निष्ठांचे उत्पादन करीत नाहीत. कृषी विभागाच्या मान्यता प्राप्त कंपनीच्या कृषी निविष्ठा या सिलबंद खरेदी करून शेतकऱ्यांना विक्री केली जाते. त्यामुळे कृषी विभाग मान्यता प्राप्त सीलबंद व पॅकिंगमधून निष्ठांचे दर्जाबाबत कृषी विक्रेतांना दोशी समजण्यात येऊ नये तसेच योग्य निविष्ठा विकणाऱ्या कृषी निविष्ठा विक्रेत्यावर जरब बसवण्यासाठी अन्यायकारक कायदे विक्रेत्यांवर लागू करू नये. यासह अन्य मागण्यांसाठी हा बंद आयोजित करण्यात आलेला आहे. पुलगाव कृषी व्यवसायी संघाचे अध्यक्ष प्रमोद फुलकरी, उपाध्यक्ष भूषण राठी, सचिव मुरलीधर झाडे, कोषाध्यक्ष सुभाष पेशकर, सचिन चरडे, गौतम लोनकर, गिरीराज मालपाणी, डॉ. अनिल डहाके, नितीन महाजन, सतीश खुराना इत्यादी व्यावसायिकांनी पुलगाव नायब तहसीलदार व पुलगाव पोलीस निरीक्षक यांना निवेदन देऊन आपल्या मागण्या मांडल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या कृषी व्यावसायिक धोरणातील जाचक अटी रद्द करण्यासाठी कृषी व्यवसायिकांनी तीन दिवसाचा संप पुकारलेला आहे. मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या सोयाबीनची उलंगवाडी झाली आहे .काही शेतकऱ्यांनी रब्बीसाठी जमिनी तयार केल्या आहे व त्यामध्ये चना पेरणीला सुरुवात केली आहे. परंतु तीन दिवस कृषी केंद्र बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना बियाणे खरेदीसाठी त्रास होत आहे. परिणामी काही शेतकऱ्यांना रिकाम्या हाताने शहरातून आपल्या गावी परतावे लागत आहे .शेतातील विद्युत वेळ पाहून पिकाच्या पेरणीचे शेतकरी नियोजन करत आहे. त्या नियोजनात कृषी केंद्र संपामुळे शेतकऱ्यांना त्रास सोसावा लागत आहे.

## सर्वांगीण विकास हेच ना.सुधीर भाऊंचे ध्येय-राहुल पावडे

### सार्वजनिक सभागृहाच्या पायाभरणी सोहळा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जटपुरा प्रभाग क्र. ८ येथील सपना टॉकीज जवळ नागरिकांच्या सुविधेकरिता श्री महर्षी वाल्मिकी समाजाच्या सभागृहाचे बांधकाम कॅबिनेट व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी नुकतेच मंजूर केले. ना. सुधीर मुनगंटीवार त्यांच्या विशेष प्रयत्नामुळे या बांधकामाला निधी उपलब्ध झाल्याने दिनांक २० ऑक्टोबर २०२३ ला दुपारी सपना टॉकीज मागे जटपुरा गेट येथे भूमिपूजन करण्यात आले.




महर्षी वाल्मिकी हे एक महान लेखक आणि ऋषी होते, रामायण हे महाकाव्य ज्यांच्या पवित्र लेखणीतून उमटले असे हे महाकवी. श्रीरामाची कथा सांगणारे रामायण संस्कृतमध्ये लिहिले गेले होते आणि त्यात २४,००० श्लोक आहेत. अशा या पूज्य संताच्या स्मरणार्थ समाज भवनाचे भूमिपूजन हा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राहुल पावडे, जिल्हाध्यक्ष भाजपा (श),डॉ. मंगेश गुलवाडे, छबुताई वैरागडे विशाल निंबाळकर राहुल घोटेकर भाजपा नेते तथा मनपा सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी बोलतांना भाजप महानगराध्यक्ष राहुल पावडे म्हणाले,लोकनेते सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून जनतेच्या मागणीवर या सभागृहाचे निर्माण होणार आहे.समाजातील शेवटच्या माणसाची सेवा करणे हा भाजपाचा उद्देध आहे.सर्व समाजाचा सर्वांगीण विकास हेच ध्येय सुधीरभाऊंचे आहे.यामुळेच ते प्रत्येकांशी थेट संवाद साधतात.या नंतरही विकासाचा झंझावात सुरू राहील अशी माहिती त्यांनी दिली.कार्यक्रमाचे आयोजन सपना टॉकीज परिसरातील वाल्मिकी समाजाच्या वतीने करण्यात आले.कार्यक्रमाला प्रमोद शिरसागर, रवी लोणकर, विठ्ठल डुकरे, धनराज सावरकर, सुनील डोंगरे, सत्यम गाणार, लखन, भैय्याजी बुलगज, रमेश सरसर, अनिल, अशोक, अशोक हटवाल, संजय छप्पर, विनोद राज खोडे, अमोल मते आदींची उपस्थिती होती.

## इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव येथे दिपोत्सव प्रकल्प

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय इंडियन मिलिटरी स्कूल मध्ये अटल टिंकरिंग प्रयोगशाळा शासनाने पुरस्कृत केली आहे. या अटल टिंकरिंग प्रयोगशाळेत वर्षभर विविध कार्यक्रम राबवून विद्यार्थांच्या तांत्रिक बुद्धिमत्तेला चालना दिली जात असते. यावेळी दिप निर्माण प्रयोगघेण्यात आला . या प्रयोगामधे दिप पाण्याद्वारे प्रज्वलित होतो.या प्रयोगामध्ये सर्व विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करुन घेण्यात आले. वेगवेगळ्या रसायनाची माहिती मिळवून विद्यार्थ्यांनी पाण्याद्वारे पेटणारे दिवे यशस्वीरित्या तयार केले. या उपक्रमात अटल प्रयोग शाळेच्या वतीने कांडलकर .आशिष साळवे , निलेश जगताप , सर्व विज्ञान शिक्षकांनी मार्गदर्शन केले.शाळेचे कमांडंट कर्नल पाटील, शाळेचे मुख्याध्यापक रविकिरण भोजने सर्व विद्यार्थी व सर्व विज्ञान शिक्षकांचे अभिनंदन केले.



## पोलीस स्टेशन शेगाव (बू )अंतर्गत येत असलेल्या ग्रामपंचायतची निवडणूक शांततेत पडली पार

**वरोरा । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन शेगाव( बु ) अंतर्गत सालोरी व ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली . या निवडणुकीमध्ये सालोरी ग्रामपंचायत निवडणुकीत ८५.५३% आणि अर्जुनी ला ७३.५०% मतदान झाले .

पोलिस स्टेशन शेगाव बू चे ठाणेदार यांनी सालोरीं आणि अर्जुनी गावातील सर्व उमेदवारांची मीटिंग घेऊन निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडावी या साठी सूचना दिल्या होत्या. त्या प्रमाणे सालोरी आणि अर्जुनी गावातील उमेदवार यांनी पोलिस प्रशासनाला सहयोग करीत मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पुरेपूर सहयोग केला. त्यामुळे सालोरी आणि अर्जुनी गावातील मतदान प्रक्रिया



पूर्णतः शांततेत पार पडली. गावकऱ्यांनी पण या वेळी ग्रामपंचायत निवडणूक येवढ्या शांततेत पार पडले या साठी शासनाचे आभार मानले.सर्व उमेदवार यांनी एकतेचा संदेश देत मतदान झाल्यावर सोबत फोटो काढून आनंद व्यक्त केला.

## संपादकीय

# निकड शांततेची



समाजस्वास्थ्यालाच तडा जात असल्याने केवळ तात्कालिक राजकीय फायद्यापुरता विचार न करता अधिक दूरगामी व व्यापक उपाययोजनांचा विचार राजकीय वर्गाकडून; विशेषतः सत्ताधाऱ्यांकडून अपेक्षित आहे.ऐन दिवाळीच्या तोंडावर महाराष्ट्राची 'प्रकृती' कमालीची ढासळत चालली आहे. एकीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांच्या काही सहकारी आमदारांच्या अपात्रतेचा प्रश्न आ वासून उभा आहे; तर त्याचवेळी मनोज जरांगे-पाटील यांचे बेमुदत उपोषण, आंदोलनाची वाढलेली तीव्रता आणि काही ठिकाणी त्याला लागलेले हिंसक वळण, अशा दुहेरी पेचात सत्ताधारी अडकले आहेत.खरे तर आरक्षणावरून सुरू असलेल्या या आंदोलनात सर्वच पक्षांपुढे आव्हान उभे राहिले आहे, असे म्हटले पाहिजे. याचे कारण आरक्षणाचा मुद्दा काल किंवा आज उपस्थित झालेला नाही. गेली अनेक वर्षे, चर्चा, समित्या, अहवाल, आश्वासने, न्यायालयीन सुनावण्या आणि स्थगित्या अशा दीर्घकालीन चरकातून जाऊनही त्यातून काही निष्पन्न झाले नाही.आधी अपेक्षा निर्माण करायच्या आणि मग चालढकल, या शैलीमुळे एक संतापाची भावना निर्माण झाली आहे. त्यातून कायदा हातात घेण्याचे प्रकार समर्थनीय नसले तरी प्रश्नाच्या मुळाशी जायला हवे, याची जाणीव करून देणारा हा उद्रेक आहे. त्याचवेळी हेही सांगायला हवे, की आगी लावणे, रस्ते अडवणे; विशेषतः एसटी बसगाड्यांना आगी लावण्यासारखे प्रकार हा आंदोलनाचा भाग असू शकत नाही.आंदोलनात जर समाजकंटक घुसले असतील, तर या बाबतीत सखोल चौकशी करून कारवाई व्हायला हवी. एसटीने प्रवास करणारा वर्ग हा गरीब असतो. त्यालाच जर झळ बसत असेल तर आंदोलनाच्या मूळ उद्दिष्टालाच हरताळ फासला जातो. सर्वात प्रथम कायदा-सुव्यवस्था सामान्य व्हायला हवी.वातावरण प्रक्षुब्ध असताना त्यात तेल ओतण्याचे काम कोणीही करता कामा नये. समाजातील सर्वच घटकांनी शांतताप्रस्थापनेसाठी सहकार्य केले पाहिजे. अठ्ठेचाळीस तास उलटून गेल्यावरही पोलिस परिस्थिती नियंत्रणात का आणू शकत नाहीत, हाही प्रश्न उपस्थित झाला आहे.या सगळ्या पार्श्वभूमीवर मग मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांची भेट घेतल्यावर राजकीय वावड्या उठणे स्वाभाविकच होते. त्यात सरकार मराठा आरक्षणाबाबत पुन्हा एक अध्यादेश काढणार आहे आणि त्यानंतर बहुधा विधानसभाच विसर्जित केली जाईल, असे अनेक मुद्दे राजकीय अवकाशातच नव्हे तर सोशल मीडियावरूनही भिरभिरू लागले.मात्र, आता हा प्रश्न केवळ राजकारणापुरता मर्यादित राहिलेला नाही तर त्यामुळे राज्याचे एरव्ही उत्तम असलेले समाजस्वास्थ्यही धोक्यात आले आहे. शिवाय केवळ राजकीय चौकटीत विचार करून या सामाजिक उद्रेकाचा अर्थ लावता येईल, असे नाही. म्हणूनच मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीवर टिकाऊ तोडगा काढण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे.मराठवाड्यात आणि राज्याच्या विविध भागात निर्माण झालेली आंदोलनाची धग पाहून अखेर सरकारला सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेणे भाग पडले आहे. या बैठकीत आरक्षणाबाबत काही तोडगा निघणे हे केवळ अशक्य आहे. कोणत्याही समाजाला नव्याने आरक्षण द्यायचे असेल तर त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली आरक्षणाची मर्यादा ओलांडावी लागणार आहे आणि तो निर्णय केवळ संसदेतच होऊ शकतो.अर्थात, हे खुद्द उपोषण करीत असलेल्या मनोज जरांगे-पाटील यांनाही ठाऊक आहे. त्यामुळेच त्यांनी आता समस्त मराठा समाजाला सरसकट 'कुणबी' म्हणून जाहीर करण्याची मागणी केली आहे. तो न्यायालयीन कसोट्यांवर टिकू शकेल काय, याचाही विचार सरकारला करावा लागणार आहे. सध्याच्या उद्रेकामागे आरक्षणाची मराठा समाजाची आकांक्षा आहेच; पण केवळ तेवढेच कारण आहे, असे मानणे भ्रामक ठरेल.गेल्या सव्वा वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणाचा जो काही विचका झाला आहे, त्यातून आलेली उद्विग्नताही त्यात दिसते. याशिवाय शेतीच्या प्रश्नाची वाढत असलेली तीव्रता, शेतीवर अवलंबून असलेल्यांची वाढती संख्या, अन्य क्षेत्रातील घटलेल्या रोजगारसंधी, त्यातून ठळक होत जात असलेले विषमतेचे चित्र अशा दुखण्याचा या सगळ्याशी संबंध आहे. पण या सर्वच प्रश्नावर काही दूरगामी उपाययोजना करण्याऐवजी वेळोवेळी तात्पुरते तोडगे काढण्याच्या सवयीमुळे तो विकार खोलवर मुरलेला आहे.या परिस्थितीत एकूण राजकारणी, राजकीय प्रक्रिया यांविषयीच जे वैफल्य व्यक्त होत आहे, त्याचाही गांभीर्याने विचार केला पाहिजे. याचे कारण असे वैफल्य हा लोकशाहीपुढचा सर्वात मोठा धोका असतो. त्यामुळेच या उद्रेकातून आपल्याला राजकीय फायदा कसा मिळविता येईल, प्रतिस्पर्ध्यांना कसे कोंडीत पकडता येईल, याची संधी शोधणे याइतका बेजबाबदारपणा दुसरा कोणताही नाही.निदान आता तरी राजकीय उखाळ्यापाखाळ्या बंद करून राज्याच्या बिघडलेल्या समाजस्वास्थ्याचा गांभीर्याने विचार सर्व पक्षाच्या राजकीय नेत्यांनी आणि समाजधुरिणांनीही करायला हवा.

# 'सत्तर तासां'चा मुद्दा इच्छाशक्तीचा



ध्येय समोर असले आणि ते मिळवण्यासाठी लागणारी उत्कटता असली की, माणूस आठवड्याला सत्तर तास काम करू शकतो. ती भावना क्षीण झाली की मात्र तो कामाचे तास मोजायला लागतो! या विषयाला असे बरेच कंगोरे आहेत. नारायण मूर्ती यांनी केलेल्या आवाहनावरून त्यामुळेच उलटसुलट चर्चेचे पेव फुटले. पण हा मुद्दा दृष्टिकोनाचा आहे. नारायण मूर्ती त्यांचा एक दृष्टिकोन मांडत आहेत आणि तो सरसकट झटकून टाकावा, असे वाटत नाही.'इन्फोसिस'चे संस्थापक, माहिती-तंत्रज्ञान उद्योग क्षेत्रातील अध्वर्यू नारायण मूर्ती यांच्या एका विधानाने एका नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. 'तरुणांनी आठवड्यात ७० तास काम केलं पाहिजे', असे मत त्यांनी व्यक्त केले आणि त्यावर उलटसुलट प्रतिक्रियांचे मोहोळ उठले. आधीच माहिती-तंत्रज्ञान (आयटी) उद्योगात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या स्वास्थ्याविषयी काळजी व्यक्त होत आहे.

त्यांच्यात रक्तदाब, हृदयविकार यांसारख्या विकारांचे प्रमाण वाढत असल्याची चिंता अलीकडे वारंवार व्यक्त होत असतानाच ही सत्तर तासाच्या कामाची सूचना आल्याने अनेकांना आश्चर्य वाटले. या उद्योगात काम करणाऱ्या तरुणांमधील घटस्फोटाचे प्रमाणही वाढत असल्याचे बोलले जाते. अशावेळी कामाचा वेळ आणि स्वतःचे आयुष्य यांच्यातील समतोल आणखी बिघडवणारा बदल कशासाठी, असा प्रश्न विचारला जात आहे.देशाच्या प्रगतीसाठी, उत्पादकतावाढीसाठी आठवड्यातून सत्तर तास कामाची सूचना एकीकडे आणि कर्मचाऱ्यांचे आरोग्य, खासगी आयुष्य यांत निर्माण होत असलेले प्रश्न दुसरीकडे, अशा दोन बाजू या निमित्ताने पाहायला मिळत आहेत.यातली मेख अशी की, तुम्ही कुठल्या बाजूने बघाल ती प्रत्येक बाजू तुम्हाला बरोबर वाटू शकेल. माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांच्या दृष्टीने बघता बऱ्याच कंपन्या चांगले, कुशल, बुद्धिमान कर्मचारी मिळवण्यासाठी आणि राखण्यासाठी उत्तम पगार देतात. ह्या चढाओढीमध्ये बऱ्याच वेळा कर्मचाऱ्याला त्याच्या अनुभवापेक्षा जास्त पगार दिला जातो. कंपनी फायद्यात राहाण्यासाठी कर्मचाऱ्याच्या पगाराच्या तिप्पट नफा मिळण्यासाठी कंपनी प्रयत्नशील असते.आता त्या कमी अनुभव असलेल्या कर्मचाऱ्याला जास्त पगार दिला असल्याने त्याने जास्त काम केल्याशिवाय तेवढ्या अपेक्षित प्रमाणात फायदा मिळवणे अवघड असते. म्हणून कंपन्या त्याने जास्त काम करावे यासाठी जास्तीत जास्त सुविधा देऊन त्याच्याकडून काम करून घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात.कर्मचाऱ्यांनी नोकरी बदलली तर त्यांना ३० ते ४० टक्के पगारवाढ सहज मिळू शकते. शिवाय आजकाल एक ऑफर हातामध्ये ठेवून दुसरी नोकरी बघत राहणे आणि दुसऱ्या कंपनीशी वाटाघाटी करून जास्त पगार घेणे, हा तर अगदी प्रचलीत व्यवहार झाला आहे. त्यामुळे आपला अनुभव किती आहे आणि त्याप्रमाणे आपण कंपनीला काय देऊ शकतो, याचा विचार न करता बरेच कर्मचारी जास्तीत जास्त पगार कसा मिळेल याच्यामागे असतात.जास्त पगार दिल्यामुळे तयार झालेल्या कंपनीच्या अपेक्षा आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या अवघड गोष्टी याचा विचार मात्र बऱ्याचदा आधी केला जात नाही. कर्मचारी गलेलठ्ठ पगाराकडे आणि बँक बॅलन्सकडे बघत काम करत राहतात.वैयक्तिकदृष्ट्या बघता आजकालच्या वेगवान लाइफस्टाइल आणि मोबाईलमुळे समाजात झालेला एक मोठा बदल म्हणजे कमी झालेली एकाग्रता आणि प्रत्येक गोष्टीचा तत्काळ हवा असलेला मोबदला. मग तो पैशाच्या रूपात असो, अथवा कौतुकाच्या. त्यामुळे जे काम अतिशय एकाग्रतेने केले पाहिजे आणि पुरेसा वेळ देऊन केले पाहिजे, त्यावरही परिणाम होतो.चांगल्या पगारामुळे सुधारलेली क्रयशक्ती हाही एक महत्त्वाचा विषय झालेला असतो. आता या क्रयशक्तीचा उपयोग कर्मचारी कसे करतात, हे पाहायला हवे. 'आजचा दिवस आजच जगा' हा विचार प्रमाण मानून जगणारे वेगवेगळ्या प्रकारे सुटीचा दिवस घालवतात. पाश्चात्य जगाप्रमाणे ही जनता वेळ मिळाला की किंवा शनिवार-रविवार आला की 'बॅलन्स' आणण्यासाठी पार्टी करणे, रात्रभर जागून धमाल करणे असे प्रकार करतात.पण यातून 'वर्क-लाइफ बॅलन्स' साधला जातो का? खरे तर यामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणामदेखील विचारात घेतले पाहिजेत. फक्त कामामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतो का? तसा समज असेल तर तो सदोष आहे, असे म्हणावे लागेल.आयुष्याचा खरा आनंद हा तब्येत जपणे, नेम पाळणे, ध्येय निश्चित करून ते गाठण्यासाठी लागणारे कष्ट करणे, आणि त्याचवेळेस आपलं कुटुंब, आपले आई- वडील, मित्रमंडळी, समाज, या सर्वांसाठी वेळ देणे आणि आपली कर्तव्य पार पडणे यालाही वर्क- लाइफ- बॅलन्स म्हणता येईल. आपले शेतकरी पेरणीच्या किंवा खुडणीच्या दिवसात ६०-७० तास श्रम सहज करतात. कित्येक छोटे-मोठे व्यावसायिक आठवड्याला ७० तास सहज काम करताना दिसतील.कित्येक परिचारिका एवढा वेळ आरोग्यसेवेच्या महत्त्वाच्या कामात असतात. सीमेवरचे जवान ७० तास अहोरात्र गस्त ठेवतात. या सर्वांच्याही वेगवेगळ्या समस्या असतील; पण आपण स्वतःच वाढवलेल्या भरमसाठ अपेक्षा आणि गरज नसताना फुगवलेलं राहणीमान हे त्यांच्याबाबतीत आढळत नाही.आता एका वेगळ्याच आणि व्यापक पैलूवर बोलायचे म्हटले तर जागतिक स्तरावर असलेली भारताची स्थिती विचारात घेतली पाहिजे. अमेरिका, युरोप, चीन, यांच्या तुलनेत आज मनुष्यबळाच्या बाबतीत भारताची स्थिती चांगली आहे. भारताला मिळत असलेल्या आघाडीचे सर्वात महत्त्वाचे कारण हे कर्मचाऱ्यांमधील चिकाटी, जिद्द, हुशारी आणि भारतीयांची असलेली क्षमता हेच आहे.कित्येक अमेरिकी किंवा युरोपियन युनिव्हर्सिटींमध्ये आता भरपूर भारतीय तरुण विद्यार्थी शिकायला जात आहेत. कित्येक तरुण अमेरिकेत नोकरी करण्यास जात आहेत. तिकडे गेल्यावर हेच तरुण आठवड्याला ६०-७० तास काम करायला सहज तयार असतात आणि करतातही. त्याचे कारण हे त्यांचे ध्येय आणि पॅशन हेच आहे. याचा अर्थ भारतीय तरुणाईत क्षमता ही आहेच.थोडक्यात काय तर ध्येय समोर असले आणि ते मिळवण्यासाठी लागणारी उत्कटता असली की, मनुष्य ७० तास काम करू शकतो. ती भावना क्षीण झाली की मात्र तो कामाचे तास मोजायला लागतो. ७० तास काम या विषयाला असे बरेच कंगोरे आहेतच. पण मुळात सत्तर तासाची सक्ती कोणीच करीत नाही.नारायण मूर्ती यांच्या सांगण्याचा हेतूदेखील विशिष्ट संस्थेसाठी, मालकासाठी ७० तास राबा असा नाही. त्यांचे म्हणणे असे की, ज्या देशांनी प्रगतीची शिखरे गाठली, त्या देशातील मनुष्यबळाचा त्यात मोठा वाटा असतो. त्यामुळेच ध्येयाने भारलेल्या तरुण पिढीने जर निश्चय केला, तर ते खरोखरच आश्चर्यकारक वेगाने प्रगतीची शिखरे गाठू शकतात.युरोप, अमेरिकेतही एवढे कामाचे तास नाहीत, असे काहीजण म्हणत आहेत. पण या देशांनी प्रगतीचा एक टप्पा गाठला आहे. आपल्याला अद्याप तो गाठायचा आहे, याचे भान विसरता कामा नये. दुसरे म्हणजे नारायण मूर्ती यांनी केलेले हे फक्त आवाहन आहे. प्रत्येकाने त्याविषयी स्वतः ठरवायचे आहे. त्यामुळे यात चूक, बरोबर असे काहीच नाही.७० तास काम करणे हे शक्य तर आहेच; पण ते कोणाला किती जमेल ते परिस्थिती, क्षमता, व्यवस्था, आर्थिक स्थिती, मनुष्यस्वभाव, एखाद्याची समज, ध्येय, आवड अशा अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. पण एक सोपा नियम सांगायचा म्हणजे, माणसाने प्रथम आपली क्षमता आणि आपली तब्येत ह्याला प्राधान्य द्यायला पाहिजे. त्यानंतर आपले ध्येय, स्वभाव आणि जबाबदाऱ्या यानुसार आपण काय आणि किती करायचे हे ठरवले तर बरेच सोपे होऊ शकेल.समाधान हे हवेच आणि त्यातूनच खरा आनंद मिळेल हे ज्याला कळले तो ह्या चक्रात अडकलेला दिसणार नाही. जेव्हा जमतेय तेव्हा भरपूर काम करा, कष्ट करा आणि चांगली संपत्ती जमवा. नारायण मूर्तींनाही भारतीयांची क्षमता माहीत आहेच. म्हणूनच ते 'तरुणांनी ७० तास काम करावे', असे म्हणाले. केवळ कंपन्यांची नव्हे तर प्रत्येकाची वैयक्तिक आणि देशाची प्रगतीही त्यांना अभिप्रेत असणार, यात शंका घेण्याचे कारण नाही.

# दिलाशाची पणती



राज्यातील सध्याच्या स्थितीने सर्वांची मने सुन्न आहेत. आंदोलनाला समर्थन तरीही हिंसाचाराची धास्ती असे चित्र सर्वत्र दिसले. पीकपाण्याची चिंता सोडून अवघे राज्य जातीय फेऱ्यात अडकल्याची टीका झाली. आरक्षणाच्या मागणीला जनतेचा विरोध नाही. जाळपोळीने मात्र सामान्यांचा थरकाप उडाला. बळीराजा अडचणीत असताना द्वेषाचे पलिते उंचावणाऱ्यांबाबतची नाराजी समाजमाध्यमांतून झळकली.राज्याचे सुकाणू या मुद्द्याभोवती एकवटले असताना पीकपाण्याची काळजी निसटते की काय, असे वाटत होते. अशा स्थितीत शेतीचिंता ऐरणीवर आली, हे बरे झाले. पावसाचे प्रमाण घटल्याची केवळ खंत व्यक्त न करता तातडीने दुष्काळ घोषित करून समस्यांची उकल शोधण्याचा प्रयत्न झाला. खरीप हंगामासाठी ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. समयोचित निर्णयांची परिणामकारकता अधिक असते. उत्तरे रेंगाळली की परिणाम लांबतात. हा उशीर परवडणारा नसतो. चाळीस तालुक्यांमधील दुष्काळाच्या घोषणेतून उद्विग्नतेतही सरकार जागे असल्याचे संकेत गेले. हा पहिला टप्पा आहे. अल्प पाऊसपट्ट्यातील माहिती घेऊन अन्य तालुक्यांचाही समावेश पुढील टप्प्यात होईल. फटका बसलेल्या शेतकऱ्यांना सरकारी मदतीचा फायदा होतो. आपल्याला वाली नाही ही शेतकऱ्यांच्या मनात उत्पन्न होणारी निराशा वेळेवरील निर्णयामुळे निश्चितच टळली. सरकारने ज्या क्षेत्राला दुष्काळाच्या सीमेत आणले, त्यातील चोवीस तालुक्यांमध्ये स्थिती गंभीर आहे. सोळा तालुक्यांत स्थिती मध्यम आहे. यंदाच्या पावसात एकवीस दिवसांहून अधिक खंड पडला. विदर्भ-मराठवाड्यापासून अगदी तळकोकणापर्यंतची पाणीपातळी खालावली. धरणांचा ओसंड आटला. ना सोयाबीन फुलले, ना कापूस उमलला. भातशेतीची, फळबागांची अवस्थाही अशीच बिकट झाली. त्यातून जनावरांच्या चाऱ्याची समस्या उद्भवली. सर्वत्र टँकर वाढले. घटत्या पाणीस्तरामुळे उत्पन्नासोबतच शेतकऱ्यांचे हास्यही कोमेजले. हे दुष्टचक्र बळीराजाला नेहमीच बेजार करते. सरकारी विभागांनी शिफारस केलेल्यांपैकी दोन तालुके तेवढे सरकारने वगळले.घामाला मोल मिळविण्यासाठी शेतकरी परिश्रमांची शर्थ करतात. विज्ञानयुगातही लहरी निसर्गाची साथ कशी लाभेल, याविषयीचे साशंक मन घेऊन त्यांना राबावे लागते. या अनिश्चिततेत शेतकऱ्यांना अधिक सुरक्षा हवी. दुष्काळाची घोषणा हे संरक्षक कवच आहे. त्याचे फायदे दूरगामी असतात. राज्यात सर्वप्रथम नजर आणेवारी येते. त्यानंतर पीकपरिस्थिती पाहून ऑक्टोबरच्या अखेरीस दुसरा अहवाल येतो. वर्षाअखेरीस अंतिम अहवाल आल्यानंतर दुष्काळाची घोषणा होते. आता चाळीस दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शेतकऱ्यांना जमीन महसूलात सूट मिळेल. पीककर्जांच्या पुनर्गठणाची संधी लाभेल. कर्जाच्या वसुलीतूनही त्यांची सुटका होईल. कृषी पंपांच्या चालू वीजबिलाची सवलत त्यांच्या वाट्याला येईल. अवर्षणग्रस्त विद्यार्थ्यांना शुल्कातून मिळणारी संपूर्ण सूट सकारात्मक संकेत देणारी ठरेल. राज्यकर्त्यांचे असे पाठीशी असणे सामान्यांना हिंमत देते. यंदाची भीषण स्थिती लक्षात घेऊन राज्याने तातडीने पावले उचलली. अर्थात, दुष्काळसदृश स्थितीतही आणेवारी अधिक आल्याची आजवरची उदाहरणे आहेत. या पद्धतीचे निकष जुनाट असल्याचा आरोप नेहमी होतो. काहीवेळा राजकीय दबावातूनही विरोध वाढतो. अचानक अधिकारीवर्ग पन्नास टक्क्यांहून कमी आणेवारीचा अहवाल देतात. मग दुष्काळ अवतरतो. पर्जन्यमान, लागवडक्षेत्र आणि संभाव्य उत्पन्नाचे वास्तविक मूल्यांकन झाले, तरच बळीराजाला खरे समाधान मिळते. बदलत्या पीक परिस्थितीचा अंदाज घेऊन जुने निकष बदलावेत. सरकारने त्यावर शास्त्रशुद्ध काम करावे. दुष्काळग्रस्तांच्या हेक्टरी मदतीबाबतची स्पष्टता यावी. मराठा आंदोलनाने राज्यकर्त्यांचा त्रागा वाढविला आहे.

ग्रामीण महाराष्ट्र पीकपरिस्थितीमुळे चिंताक्रांत आहे. हा घोर वाढतो तेव्हा आत्मघाताचे पाश शेतकऱ्यांभोवती आवळू लागतात. ही 'कॉपीकॅट पद्धत' जीवघेणी ठरते. कुठलाही दुष्काळ अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करतो. कंत्राटदारांची चांदी आणि शेतकऱ्यांचे मरण हा नोकरशाही ठोकताळा प्रत्येक दुष्काळाला लागू होता कामा नये. सरकारने याबाबत डोळ्यांत तेल घालून काम करावे. बळीराजा नैराश्यग्रस्त होऊ द्यायचा नसल्यास व्यवस्थेतील मानवी चेहरा जिवंत ठेवण्याचे आव्हान सरकारला पेलावे लागेल. विलंबाचा आजार जडलेल्या प्रशासनातून समाज कमकुवत होत जातो. समयोचित निर्णयांचा काढा हीच त्यावरील योग्य मात्रा आहे. सध्याची स्थिती दोलायमान आहे. लाखो शेतकरी कुटुंबांपुढील अंधार अद्याप निमालेला नाही. दिवाळीच्या पुढ्यात दुष्काळाचा पहिला टप्पा घोषित करून राज्य सरकारने दिलाशाची एक पणती उजळली आहे. पुढील टप्प्यात निकषांनुसार चाळीस तालुक्यांचा उंबरा विस्तारावा. या सवलत संरक्षणातून बळीराजाला बळ मिळावे, ही आशा आहे. प्रार्थनाही आहे

# एकनाथ खडसे यांना हृदयविकाराचा झटका:उपचारासाठी मुंबईत आणले जाणार

**मुंबई**–राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा विधान परिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांना हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती मिळत आहे. एका वृत्तवाहिणीने या संदर्भातील माहिती दिली. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तात्काळ हवाई रुग्णवाहिकेची सोय करुन दिली जावी, अशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. तर पुढील काही वेळातच खडसे यांना मुंबईतील रुग्णालयात दाखल केले जाणार आहे. हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती मिळताच मुख्यमंत्र्यांनी तात्काळ मदतीच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.दुपारच्या सुमारास खडसे यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर तात्काळ त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुख्यमंत्री शिंदे यांना याची माहिती कळल्यानंतर त्यांनी खडसे यांना उपचारासाठी मुंबईत आणण्याची तयारी सुरु केली आहे. त्यांच्यासाठी हवाई रुग्णवाहिकेची सोय करण्यात आली आहे.जळगाव येथील रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले. मात्र, पुढील उपचारासाठी त्यांना मुंबईला हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. एकनाथ खडसे यांना मुंबईला हलविण्याची तयारी करण्यात येत होती. मात्र, तातडीने उपचार करण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोन केला. मुख्यमंत्री शिंदे यांनी तातडीने या घटनेची गंभीर दाखल घेतली. त्यांनी प्रशासनाला खडसे यांच्यासाठी एअर अम्बुलन्सची व्यवस्था करण्याचा सूचना दिल्या. काही वेळातच खडसे यांना मुंबईत आणण्यात येईल आणि त्यांच्यावर पुढील उपचार करण्यात येतील.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या मुळ गावी दरे येथील शेतात फेरफटका मारत असतानाच त्यांना एकनाथ खडसे यांच्या प्रकृतीबाबत माहिती समजली. फोन येताच मुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ एअर एम्ब्युलन्सची व्यवस्था करण्याबाबत आदेश दिले. दरम्यान, एकनाथ खडसे यांच्यावर जळगावच्या गजानन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे. आज संध्याकाळी ७.३० वाजता खडसेंना पुढील उपचारासाठी जळगावहून मुंबईसाठी उड्डाण करणार आहेत.जळगाव येथे एकनाथ खडसे यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर विवेक चौधरी यांनी काही माध्यमांशी संवाद केला. ते म्हणाले की, एकनाथ खडसे यांना दोन दिवसांपासून अस्वस्थ वाटत होते. छातीत दुखणे आणि खोकला सुरू होता. त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. मधुमेह आणि इतर जुने आजार आहेत. सध्या त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत. संध्याकाळी पुढील उपचारासाठी त्यांना मुंबईतील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.



## मनोज जरांगे करणार महाराष्ट्राचा दौरा उद्या सरकारचे शिष्टमंडळ पुन्हा घेणार भेट

**छत्रपती संभाजीनगर**–मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे पुन्हा महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. उद्या किंवा परवा ते याबाबतची घोषणा करणार आहे. तसेच, सरकारचे शिष्टमंडळ उद्या सोमवारी मनोज जरांगेंची पुन्हा रुग्णालयात जाऊन भेट घेणार आहे. मराठा आरक्षणाची डेडलाईन कोणती याबाबत शिष्टमंडळ चर्चा करणार असल्याची माहिती मनोज जरांगेंनी दिली आहे. त्यांनी आज सकाळी माध्यमांशी संवाद साधला.मनोज जरांगेंवर सध्या छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आज माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे म्हणाले, माझी तब्येत आता चांगली आहे. मी ठणठणीत आहे. कुणीही काळजी करु नये. मात्र, आता आरक्षण मिळाल्याशिवाय आपण शांत बसणार नाही. आतापर्यंत मराठा समाजावर खूप अन्याय झाला आहे. आता चांगले दिवस आले आहे. आरक्षण मिळण्याचा दिवस जवळ येत आहे. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत आपले आंदोलन सुरुच राहणार आहे.पुढील आंदोलनाची दिशा काय असणार याबाबत माहिती देताना मनोज जरांगे म्हणाले, मी पुन्हा महाराष्ट्राचा दौरा करणार आहे. महाराष्ट्रातील दौरा कधीपासून सुरु होणार ते उद्या किंवा परवा जाहीर करणार आहे. या दौऱ्यात आतापर्यंत राहिलेल्या भागांत



आपण जाणार असून मराठा समाज बांधवांची भेट घेणार आहे. त्यांना मराठा आरक्षणा मागची आपली भूमिका समजावून सांगणार आहे व पुढील लढाई अधिक जोमाने लढण्यासाठी त्यांना तयार करणार आहे. तसेच, मराठा आरक्षण व आंदोलनाची धग तेवत ठेवण्यासाठी राज्यातील प्रत्येक गावात १ डिसेंबरपासून साखळी उपोषण करण्याचा निर्णयही जरांगेंनी जाहीर केला.दरम्यान, आंदोलनादरम्यान राज्यात काही ठिकाणी जाळपोळ व दगडफेकीच्या घटना घडल्या. मात्र, पुढील आंदोलनात असे काहीही होता कामा नये, असेही मनोज जरांगेंनी बजावले. दुसरीकडे, जरांगेंचे आंदोलन स्थगित झाले असले व सरकार मराठा आरक्षणासाठी युद्धपातळीवर काम करत असल्याचे दिसत असले तरी मराठा आरक्षणासाठी आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे. यावर मनोज जरांगे म्हणाले, कुणीही आत्महत्या करु नका. २४ डिसेंबरपर्यंत आपणास खांद्याला खांदा लावून लढायचे आहे. न्यायाचा दिवस जवळ आला आहे. न्याय मिळवण्यासाठी सातत्य ठेवावे लागणार आहे. आतापर्यंत आमच्यावर खूप अन्याय झाला आहे. हक्काचे आरक्षण आम्हाला मिळाले नाही. आम्हाला शेती पाहायची आहे आणि मुलांसाठी काम करायचे आहे. आता आरक्षण मिळाल्याशिवाय आंदोलन थांबणार नाही. आपले आंदोलन शांततेचे आणि लोकशाही मार्गाचे आहे. उद्रेक होईल, असे काही करु नका.मनोज जरांगे पाटील म्हणाले, सरकारचे शिष्टमंडळ उद्या सोमवारी परत भेट घेणार आहे. त्यावेळी टाईमबॉन्डचा मुद्दा निकाली लावणार आहोत. मराठा आरक्षणासाठी राज्यात प्रथमच एकाच वेळी तीन समित्या काम करत आहे. मागावर्गीय आयोग, शिंदे समिती आणि न्यायमूर्तींची समिती काम करत आहे. यामुळे आता पूर्ण आरक्षण मिळण्याचा दिवस जवळ आला आहे.

## जनाधार नसलेल्या पक्षाला फार महत्त्व देण्याची गरज नाही–राधाकृष्ण विखे पाटील

**अकोला**–शरद पवार यांच्याकडे असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस जनाधार गमावला पक्ष आहे. अशा लोकांच्या मागणीला जास्त महत्त्व देण्याची गरज नाही, असा टोला भाजप नेते तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुप्रिया सुळेंना लगावला. पक्षविरोधी कृती केल्यानं सुनिल तटकरे यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. त्यावर विखे पाटील यांनी तटकरेंची बाजू घेत सुळेंना टोला लगावला. राधाकृष्ण विखे पाटील रविवारी अकोल्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.खासदार अपात्रतेबाबत सुप्रिया सुळे यांचं पत्र चर्चेत आलंय. सुळे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठलय. त्यात अजित पवार यांच्या गटासोबत गेलेल्या खासदार सुनिल तटकरे यांना अपात्र करण्यासाठी ४ जुलै रोजी याचिका दाखल केली. त्यावर कुठलीही कारवाई झाली नाही. लवकरात लवकर याबाबत निर्णय घेण्याची विनंती सुळे यांनी केली.सुप्रिया सुळे यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले की, परिशिष्ट १० नुसार पक्षविरोधी कृती केल्याने सुनिल तटकरे यांच्यावर कारवाई करावी. यावर विखे पाटील यांनी अशा बाबींना फार महत्त्व देणं गरजेचे नसल्याचे म्हटले. शरद पवार आणि



त्यांच्या गटानं जनाधार गमावलाय. त्यामुळं ज्यांना आधारच नाही अशांच्या बोलण्याकडे काय लक्ष द्यायचं, अशी तिखट प्रतिक्रिया विखे पाटलांनी दिली.राज्य मंत्रिमंडळ विस्ताराचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री द्वय देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे घेतील. मंत्रिमंडळ विस्ताराचा मुद्दा हा या तीन नेत्यांच्या अखत्यारितील आहे. त्यामुळे त्यावर अधिक भाष्य करणे योग्य होणार नाही, असे विखे यांनी नमूद केले.

## बारामतीत अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपचेच आव्हान

**बारामती**–पवार कुटुंबीयांचा बालेकिल्ला असणाऱ्या बारामतीमधील काटेवाडी ग्रामपंचायतीत आज मतदान होत आहे. विशेष म्हणजे अजित पवार भाजपसोबत सत्तेत गेले असले तरी काटेवाडीत मात्र अजित पवार गटाविरोधात भाजपच उभा ठाकला आहे. याठिकाणी अजित पवार गट आणि भाजप यांच्यात चुरशीची लढत होत आहे. त्यामुळे अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.ग्रामपंचायत निवडणूक ही कोणत्याही पक्षाच्या चिन्हावर लढवली जात नाही. मात्र, बहुतांश वेळी ग्रामपंचायत निवडणुकीत उभे राहणारे पॅनेल हे एखाद्या राजकीय पक्षाशी संबंधित तरी असतात किंवा या पॅनेल्सना राजकीय पक्षांचा पाठिंबा तरी असतो. विशेषत: नेत्यांचे बालेकिल्ले असलेल्या मतदारसंघांमधील ग्रामपंचायत निवडणुकीला राजकीय किनार असतेच. बारामतीमध्येही आज असाच सामना रंगताना दिसून येत आहे. मात्र हा सामना सत्तेत गेलेल्या अजित पवार गट विरुद्ध भाजप असा असल्याने यात कोण बाजी मारणार? याकडे अवघ्या राज्याचे लक्ष असणार आहे.काटेवाडीत आज मतदानाला सुरुवात होताच भाजप पॅनेलचे नेते पांडुरंग कचरे यांनी अजितदादा गटाच्या



पॅनेलवर गंभीर आरोप केला. मतांसाठी अजितदादा गटाच्या पॅनेलच्या नेत्यांनी गावात पैसे वाटले, असा आरोप त्यांनी केला. मात्र, अजित पवार गटाच्या नेत्यांनीही हे आरोप फेटाळून लावत आम्ही विकासाच्या मुद्द्यावरुन भाजपवर पलटवार केला.भाजप पॅनलचे प्रमुख पांडुरंग कचरे म्हणाले की, ही निवडणूक काटेवाडी ग्रामस्थांचा स्वाभिमान जिवंत ठेवण्यासाठी आहे. काटेवाडीतील भ्रष्टाचार समोर आहे. गावात अनेक सेवा सुविधा नाही आहे. राष्ट्रवादीचे नेते काम केल्याचे सांगतात. मात्र नाव मोठे लक्षण खोटे आहे. काटेवाडीत मतं विकायला काढले आहेत. रात्री गावात ४ हजार लोकांना पैसे वाटले. गावातील अनेक विकास काम झाली नाहीत. अनेक प्रश्न सुटले नाहीत. ही निवडणूक म्हणजे जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशी आहे. तसेच, काटेवाडीत यंदा १०० टक्के परिवर्तन होईल. काटेवाडीतील लढाई आम्ही जिंकणार, असा दावादेखील त्यांनी केला.काटेवाडी माजी सरपंच विद्याधर काटे यांनी भाजपचे सगळे आरोप फेटाळून लावले. विद्याधर काटे म्हणाले, आम्ही काही पैसे वाटले नाहीत. काटेवाडी गावात पूर्ण विकास केला आहे. आम्ही भ्रष्टाचार केल्याचे पुरावे भाजपने द्यावे. आम्हीदेखील त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करु शकतो. काटेवाडीत अजित पवारांच्या मार्गदर्शनाखाली चांगले काम सुरु आहे. बाकी कोणत्याही मुद्द्यावर नाही तर विकासाच्या मुद्द्यावर काटेवाडीत निवडणूक लढवत आहोत. अजितदादांच्या नेतृत्वाखाली १०० टक्के पूर्ण पॅनल निवडून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आज सकाळीच काटेवाडीत मतदानाचा हक्क बजावला. यावेळी सुनेत्रा पवार म्हणाल्या, काटेवाडीत लोकांचा अजितदादांवर विश्वास आहे. काटेवाडीत आम्ही विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवत आहोत. लोक आमच्यासोबत आहेत.

## गजानन कीर्तिकरांनी रामदास कदमांना सुनावलं

**मुंबई**–लोकसभा निवडणुकीला काही महिन्यांचा कालावधी उरला आहे. अशातच शिंदे गटातील धुसफूस समोर आली आहे. मुंबईतील उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघातील खासदार गजानन कीर्तिकर यांचं वय झालं आहे. त्यामुळे गजानन कीर्तिकर उभे राहिले नाहीत, तर सिद्धेश कदम उमेदवारी मागतील, असं विधान शिवसेना नेते रामदास कदम यांनी केले होते. त्यांच्या या विधानाला आता खा. कीर्तिकरांनी प्रत्युत्तर देत सुनावलं.कीर्तिकर म्हणाले की, एका घरात दोन भावांना तिकीट देता येते का? तिकीट द्यायचं पक्षानं ठरवलं, तर मी विरोध करणार, असा इशारा त्यांनी दिला. ते एका वृत्त वाहिणीशी संवाद साधत होते.गजानन कीर्तिकर म्हणाले की, गेल्या दहा वर्षात उत्तर-पश्चिम मतदारसंघात काम केले आहे. ही जागा पुन्हा निवडून आणायची आहे. त्यामुळे निवडणूक लढण्याचा निर्णय मी घेतला आहे. सिद्धेश कदम यांच्या उमेदवारीबद्दल निर्णय झाला नाही. येणाऱ्या निवडणुकीत साडेतीन लाखांहून अधिक मतांनी निवडून येऊ शकतो, माझा



व्यक्तिगत संपर्क या ठिकाणी आहे. पक्षाबरोबरच माझी मतदारसंघात वेगळी बांधणी आहे.उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघात १०० कोटींची विकासकामे केली आहेत. पक्षात काही माणसं आली असून नेतृत्व करत आहेत. त्यांचे काही छुपे अजेंडे असू शकतात. सिद्धेश कदमसाठी रामदास कदम बोलले. पण, एकाच घरात दोन भावांना तिकीट देता येते का? पक्षानं तिकीट द्यायचं ठरवलं, तर मी विरोध करणार आहे. पक्षाला मला तिकीट द्यायचं नसेल, तर कुठल्यातरी चांगल्या व्यक्तीला द्यावे, असेही कीर्तिकर म्हणाले.रामदास कदमांनी स्वत:चा मुलगा निवडणूक लढणार हे जाहीर करण्यापेक्षा आनंदराव अडसूळ किंवा त्यांचा मुलगा अभिजीत अडसूळ यांच्याबद्दल का बोलत नाहीत? पक्षासमोर अनेक पर्याय आहेत. मी ३६ विधानसभा मतदारसंघात आढावा बैठक घेतली. त्याचा अहवालही सादर केला. तो अहवाल काय केला? मी संघटना बांधणीसाठी पुढाकार घेतला होता. पण, संघटना बांधणीसाठी संधी मिळत नाही, अशी खंतही गजानन कीर्तिकर यांनी व्यक्त केली.यावेळी त्यांनी अमोल कीर्तिकर यांच्याबाबतही भाष्य केलं. मी अमोलला स्पष्ट सांगितलं. तुला ठाकरे गट सोडून यायचं की नाही याचा निर्णय तुझा तू घे. पण मी ज्या मतदारसंघातून निवडणूक लढणार आहे, तिथून तू निवडणूक लढू नकोस. तसेच माझ्याविरोधात प्रचारही करायचा नाही. महाराष्ट्रात कुठेही जाऊन तू निवडणूक लढ. त्याला माझी हरकत नाही. पण माझ्याविरोधात लढू नको. दापोली, दाभोळ, खेड, पलगड हा जो संपूर्ण भाग आहे तिथून तू तिकडून निवडणूक लढ. तिथे मी तुझ्या विरोधात प्रचार नाही करणार, असं मी अमोलला सांगितलेले आहे.


## दिवाळीत सदावर्तेंकडून एसटी बंदचा इशारा–सुषमा अंधारे

**मुंबई**–दिवाळीत सदावर्ते यांच्याकडून एसटी बंदची हाक दिली जात आहे. ही एक राजकीय खेळी असू शकते. फडणवीसांचा बोलका बाहुला अशी ज्यांची ओळख झालेली आहे. त्यांना लोक किती स्वीकारतील हा प्रश्न आहे, असा टोला ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी लगावला.सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी गुणरत्न सदावर्ते यांच्या नेतृत्त्वातील एसटी कष्टकरी जनसंघ या एसटी कामगार संघटनेने ऐन दिवाळीत संपाची हाक दिली आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत प्रवाशांचे हाल होणार आहेत. तसेच त्यांनी मराठा आरक्षणाविरोधातही षड्डू ठोकला आहे. यामुळे ते सध्या बरेच चर्चेत आहेत.यावरून ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यानी हल्लाबोल केला आहे. सदावर्तेंना लोक स्वीकारतील का हा खरा प्रश्न आहे. परंतु, सदावर्ते दिवाळीच्या



तोंडावर खेळी करत आहेत, ही एक राजकीय खेळी आहे, असा टोला त्यांनी लगावला. त्या माध्यमांशी संवाद साधत होत्या.अंधारे म्हणाल्या की, संबंध महाराष्ट्रात मराठा आरक्षणादरम्यान गुणरत्न सदावर्ते हे फडणवीसांचा माणूस, फडणवीसांचा बोलका बाहुला आहे, असं वातावरण तयार झाले. मी फडणवीसांचा माणूस नाही किंवा फडणवीसांशी तसा अर्थाअर्थी संबंध नाही, हे सांगण्याचा भाबडा प्रयत्न म्हणून सदावर्ते फडणवीस सरकारमध्ये असताना आंदोलन करत आहेत. परंतु, लोक अशा भ्रामकतेला फसणार नाहीत, हेही तितकंच खरं, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. तर गुणरत्न सदावर्ते यांनी पुकारलेला संप ही राजकीय खेळी असल्याचे ते म्हणाले.दरम्यान, अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विमानतळावर भेट घेतली. याबाबत त्यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, सत्तेतील घटकपक्ष आहेत, राज्यातील सत्तेत ते एकत्र आहेत. त्यामुळे सत्तेतील घटकपक्षानी एकमेकांशी काय बोलावं, काय नाही बोलावं हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहेत. परंतु, दादांच्या मुख्यमंत्री पदाची चर्चा असू शकते. कारण, दादा गटाची जवळीक भाजपाशी निश्चितपणे जास्त वाढलेली आहे.

## मुनावळे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ उभारणार–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**वाई :** साताऱ्यातील मुनावळे (ता जावळी)येथे अत्याधुनिक व सर्व सोयींनी युक्त असे अंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ विकसित करण्यात येत आहे. या माध्यमातून १०५ गावातील स्थानिकांना रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री श्री शिंदे यांनी मुनावळे पर्यटन स्थळाच्या जागेची पाहणी केली व ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी, पुर्षोत्तम जाधव यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.या परिसरात पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत. त्यामुळे कांदाटी खोऱ्यातील आणखी पर्यटन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यातून स्थानिकांना त्यांच्या घरा जवळ रोजगार मिळणार आहे. याचा फायदा स्थानिक व येणारे पर्यटकांनाही होणार आहे. मुख्यमंत्री श्री शिंदे पुढे म्हणाले, मुनावळे येथे स्कुबा डायव्हिंग, बनाना राईड, जेट स्की, हाऊस बोट, बोट क्लब यासह पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येत आहेत. तसेच यामध्ये सुरक्षेचा विचार करण्यात आला आहे. त्यासाठी निरीक्षण मनोरा, पर्यटकांसाठी चेंजिंग रूम या सोयी ही असणार आहेत.

सह्याद्रीचा राखणदार



### चंद्रपुरात २३ शाळकरी मुलींना तासभर डांबले स्वच्छतागृहात

# शाळेची मान्यता रद्द करून व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करा - युवा सेनेची मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शहरातील नटराज इंग्लिश स्कूलमध्ये सॅनिटरी नॅपकीनची विल्हेवाट न लावल्याने २३ शाळकरी मुलींना तासभर स्वच्छतागृहात डांबल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला.त्यानंतर त्यांची सुटका झाल्यानंतर काही मुलींना अस्वस्थ, मळमळ, उलट्या झाल्याने पालकांनी संताप व्यक्त केला. या प्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्यावर कारवाई करण्याची मागणी पालकांनी केली आहे.



चंद्रपूर शहरात अष्टभुजा प्रभागात नटराज इंग्रजी शाळा आहे. यामध्ये शहरातील ठिकठिकाणच्या विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. ३ नोव्हेंबरला शाळकरी मुलींनी सॅनिटरी नॅपकीनचा वापर केल्यानंतर त्यांची विल्हेवाट लावत नाही. या कारणासाठी शाळेच्या मुख्याध्यापिकेने अत्यंत निर्दयीपणे सातवी ते दहावीमधील २३ शाळकरी विद्यार्थिनींना शिक्षा म्हणून पूर्ण तासभर बाथरूममध्ये बंद केले. क्रूरता आणि निष्काळजीपणाच्या या कृत्यामुळे मुलींना त्रास सहन करावा लागला. मुलींना स्वच्छतागृहातून बाहेर काढल्यानंतर काही मुलींना अस्वस्थ वाटू लागले. काहींना मळमळ होवून उलट्या देखील झाल्या.ही घटना मुलींनी शिक्षकांना सांगितली, तेव्हा त्यांना समर्थन आणि सहानुभूती ऐवजी हास्य आणि उपहासात्मक वागणूक मिळाली. त्यानंतर मुलींनी हा प्रकार आपल्या पालकांना सांगितला. त्यामुळे पालकांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला. सदर घटनेची माहिती मिळताच युवासेना जिल्हाप्रमुख विक्रांत सहारे आणि युवती जिल्हाप्रमुख रोहिणी पाटील यांनी तातडीने हस्तक्षेप करत शाळेला भेट देऊन या लज्जास्पद कृत्याचा जाब विचारला.मुख्याध्यापिका सरकार यांनी सुरुवातीला झालेल्या प्रकाराबाबत टाळाटाळ केली. परंतू युवा सेनेच्या रोषापुढे मुख्याध्यापिकेने चूक मान्य केली. चंद्रपुरात घडलेल्या या संतापजनक घटनेची विक्रांत सहारे आणि रोहिणी पाटील यांनी, जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार करणार असल्याची माहिती दिली. या बेजबाबदार वर्तनामुळे शाळेची मान्यता रद्द करून शाळा व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.यावेळी युवासेना शहर प्रमुख शहबाज शेख, युवा सेना उपशहर प्रमुख संगदीप रामटेके, युवती सेना उपजिल्हाधिकारी धनश्री हेडाऊ, अनुष्का खनके, रोशनी गोल्डर,सूरज रॉय व गोविंदा असोपा उपस्थित होते.

**पालकांनी व्यक्त केला संताप**

# शेतात गांजाची लागवड करणाऱ्यास अटक




**यवतमाळ । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेच पथकाला गोपनीय खबर्याकडून गांजा लागवडीची माहिती मिळाली.की ,राळेगाव पोलिस ठाण्यांतर्गत ग्राम गोपालनगर येथे शंकर गणपत काळे याने त्याच्या शेतात विक्री करण्याचे उद्देशाने अवैधरित्या गांजा या अमली पदार्थाच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड केलेली होती, या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धाड टाकत कारवाई केली.

घटनास्थळी पोहचून संबंधित शेतात जाऊन पाहणी केली असता शेतात शंकर गणपत काळे(वय ६०, गोपालनगर) हा हजर होता. त्याला विचारपूस केली असता त्याने हे शेत त्याच्याच मालकीचे असल्याचे सांगितले. कायदेशीररित्या या शेताची पाहणी केली असता शेतात कापूस व तूर ह्या पिकांची लागवड केलेली असून तुरीच्या उभ्या पिकामध्ये गांजा या अंमली पदार्थाच्या झाडांची लागवड केलेली आढळून आली. शंकर काळे यास ही झाडे कशाची आहेत याबाबत विचारले असता त्याने गांजा या वनस्पतीची असल्याचे सांगितले.या गांजाच्या झाडांची मोजणी केली असता एकूण ६० झाडे लागवड केली असल्याचे आढळून आले. या झाडांची पाने व खोड वेगवेगळी करून वजन केले असता खोडांचे एकूण वजन २३,२८० ग्राम आणि पाने, शेंडे व फुले या

# जांबिया मतदान केंद्राला अप्पर जिल्हाधिकाऱ्यांची भेट

### मतदान केंद्रांला पोलीस छावणीचे स्वरूप



**अहेरी । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण भागातील एटापल्ली तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त जांबिया मतदान केंद्राला अहेरीचे अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी भेट देऊन पाहणी करतानाच मतदार आणि पोलिसांशी संवाद साधला.

गडचिरोली जिल्यात एकूण २३ ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया पार पडली.त्यात जिल्ह्यातील उत्तरेकडील ११ ग्रामपंचायती आणि दक्षिणेकडील १२ ग्रामपंचायतींचा समावेश होता. जिल्ह्यातील दक्षिण भाग हा नक्षल प्रभावित परिसर म्हणून ओळखला जातो.त्यामुळे प्रशासनाने कालच हेलिकॉप्टर च्या साहाय्याने पोलिंग पार्ट्या रवाना केले होते.सकाळी ७.३० वाजेपासून पोलिसांच्या चोख बंदोबस्त मध्ये प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात करण्यात आली.यावेळी मतदान केंद्रांना पोलीस छावणीचे स्वरूप आले होते.अहेरी उपविभागतील अहेरी,सिरोंचा,भामरागड आणि एटापल्ली हे चार तालुके अप्पर जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त असल्याने त्यांनी अगदी खडतर प्रवास करून थेट एटापल्ली तालुक्यातील जांभिया मतदान केंद्राला भेट देऊन पाहणी केली.एटापल्ली तालुक्यात नागुलवाडी,हालेवारा आणि जांबिया असे तीन ग्रामपंचायतीची निवडणूक होती.जांबिया ग्रामपंचायत अंतर्गत गट्टागुडा,अडंगे,टिटोळा, पामाजीगुडा,पुस्के, जांबिया, मोडस्के आणि झारेवाडा या गावांचा समावेश असून जांबिया येथील शासकीय आश्रम शाळेत मतदान प्रक्रिया पार पडली.तीन मतदान केंद्रातून मतदान प्रक्रिया राबविण्यात आली.यावेळी विविध गावातील मतदारांनी ट्रॅक्टर वर येऊन मतदानाचा हक्क बजावला तर काहींनी पायी प्रवास करत मतदान केले.यावेळी गावचा कारभारी निवडण्यासाठी मतदारांमध्ये उत्साहाचा वातावरण दिसून आला.अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी येथील प्रभारी तहसीलदार ए बी भांडेकर यांना घेऊन मतदान केंद्राला भेट दिली.मतदारांशी त्यांनी संवाद साधत अडचण जाणून घेतली.एवढेच नव्हेतर मतदान प्रक्रिया सुरक्षित पार पाडण्यासाठी दिवस रात्र काम करणाऱ्या पोलीस अधिकारी व जवनांशी त्यांनी संवाद साधला.यावेळीगट्टा जांबिया पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक नागनाथ जावळे,पोलिस उपनिरीक्षक चैतन्य घावटे,पोलिस उपनिरीक्षक आकाश शिंदे,असिस्टंट कमांडंट मोहित कुमार उपस्थित होते.मतदान करण्यासाठी घेतला ट्रॅक्टरचा आधार

जांबिया परिसरात आजही पक्के रस्ते आणि एसटी ची सुविधा नसल्याने येथील मतदारांना ट्रॅक्टर चा आधार घ्यावा लागला.सदर ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या विविध गावातील मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आवर्जून उपस्थिती लावली.तर काही मतदारांनी पायी प्रवास करत मतदान केला.यावेळी अप्पर जिल्हाधिकारी विजय भाकरे यांनी आपली वाहन थांबवून आस्थेने विचारपूस करत अडचण जाणून घेतली.

# राज्यात आज २ हजार ३६९ ग्रामपंचायतींत मतदान:१३० सरपंच पदांसाठी पोटनिवडणूकही

**मुंबई**–राज्यभरातील २ हजार ३६९ ग्रामपंचायतींसाठी आज मतदान होत आहे. १३० रिक्त सरपंचपदांसाठी पोटनिवडणुकाही होत आहेत. सकाळी साडेसात वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. संध्याकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होईल. तर मतमोजणी उद्या ( ५ नोव्हेंबर) होणार आहे.आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने ग्रामपंचायत निवडणुकांचे महत्त्व वाढले आहे. ग्रामपंचायत निवडणुकांच्या निमित्ताने जनतेचा कौल कोणाकडे आहे? हे आजमावता येणार आहे. त्यामुळे या निवडणुकांना विशेष महत्त्व असून शिंदे गट तसेच अजितदादांच्या बंडानंतर दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.गडचिरोली आणि गोंदिया या नक्षलग्रस्त भागांत आज सकाळी ७ वाजून ३० मिनिटांनी ते दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असणार आहे. गडचिरोली आणि गोंदिया या नक्षलग्रस्त भागांत ७ नोव्हेंबर २०२३ रोजी मतमोजणी होईल. सुरक्षेच्या दृष्टीकोणातून हा निर्णय घेण्यात आला आहे.अजित पवार भाजपसोबत सत्तेत गेले असले तरी बारामतीत मात्र भाजप आणि अजित पवार गट एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. बारामती तालुक्यातील काटेवाडी ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये अजित पवार गटाच्या पॅनल पुढे भाजपाचा पॅनल उभा ठाकला आहे. तर इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील यांच्या बावडा गावात देखील भाजप विरुद्ध अजित पवार गट अशी लढत होणार आहे. बारामती तालुक्यातल्या ३१ ग्रामपंचायत, इंदापूर तालुक्यातील ६, दौंड तालुक्यातील ९ तर पुरंदर तालुक्यातील १२ ग्रामपंचायत साठी आज मतदान पार पडत आहे.

छत्रपती संभाजीनगर : ९ तालुक्यातील ६८ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. यात १६ सार्वत्रिक तर २८ ग्राम पंचायतीच्या पोटनिवडणुकांचा समावेश आहे नागपूर : नागपूर जिल्ह्यातील सर्वाधिक ३६१ ग्रामपंचायतीसाठी आज मतदान होत आहे. अमरावती : अमरावती जिल्ह्यात २० ठिकाणी ग्रामपंचायतीसाठी आज निवडणूक होत आहे. यात एक ग्रामपंचायत बिनविरोध झाली आहे. सोबतच १७ ग्रामपंचायत मध्ये



पोट निवडणूक होणार आहे ज्यात एक सरपंच पदासाठी निवडणूक होत आहे. वाशिम : वाशीम जिल्ह्यातील २ ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक होत आहे. भंडारा : भंडारा जिल्ह्यातील ६६ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीचं मतदान होत आहे. गोंदिया : जिल्ह्यातील ४ ग्रामपंचायतींमध्ये आज मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यात आज ४८ ग्राम पंचायतीच्या निवडणुका तर १० ठिकाणी पोटनिवडणुका होत आहेत. मतदान केंद्रावर हे मतदान होत असून १००० कर्मचारी या प्रक्रियेसाठी लावलेले आहेत. वर्धा : वर्ध्यात एकूण ६३ ग्राम पंचायत मध्ये निवडणूक होत आहे. यात सार्वत्रिक आणि पोटनिवडणुकीचा समावेश आहे. नाशिक : नाशिक जिल्ह्यातील ४८ ग्रामपंचायत पैकी ४५ ग्रामपंचायतसाठी आज मतदान होणार आहे. अहमदनगर : अहमदनगर जिल्ह्यात आज १९४ ग्रामपंचायतसाठी निवडणूक होणार आहे जळगाव : जळगाव जिल्ह्यात १५१ ग्रामपंचायतीसाठी आज निवडणूक होत आहे. तर इतर १६ ग्रामपंचायती या बिनविरोध झाल्यात. नंदुरबार : नंदुरबार जिल्ह्यात १६ ग्रामपंचायतींसाठी मतदान होत असून सर्व ग्रामपंचायत शहादा तालुक्यातील आहेत. धुळे : धुळे जिल्ह्यातील आज २६ ग्रामपंचायतसाठी निवडणुका होतस. तर इतर ५ ग्रामपंचायत या बिनविरोध झाल्यात. लातूर : लातूर जिल्ह्यातील १३ ग्रामपंचायतीमध्ये निवडणूक होतायत, त्यापैकी एक ग्रामपंचायत बिनविरोध निघाली आहे. सहा ग्रामपंचायतीत पोटनिवडणूक आहे. बीड : बीड जिल्ह्यात आज तब्बल १५८ ग्रामपंचायतीसाठी मतदान होत आहे, तर इतर १० ग्रामपंचायती बिनविरोध झाल्या आणि १८ ग्रामपंचायत मध्ये एकही उमेदवारी अर्ज भरला गेला नाही. सोलापूर : जिल्ह्यातील १०९ ग्रामपंचायतीची निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. यातील ९ ग्रामपंचायत बिनविरोध झाल्याने उर्वरित १०० ग्रामपंचायतीसाठी मतदान आज पार पडणार आहे. धाराशिव : धाराशिमध्ये ६ ठिकाणी ग्रामपंचायतीमध्ये निवडणूकीसाठी मतदान होईल. हिंगोली : हिंगोलीमध्ये एकूण ३२ सदस्य निवडणूक आणि बिनविरोध झालेले सदस्य २३ तर सरपंच पदासाठी एकही नाही. बारामती : बारामती तालुक्यातील ३२ ग्रामपंचायत निवडणूक आहेत. भाजप विरुद्ध अजित पवार गट अशी लढाई चंद्रपूर : जिल्ह्यात ८ ग्रामपंचायतीसाठी निवडणूक आहेत तालुकानिहाय ग्रामपंचायती आणि मागील काळातील सत्तास्थितीची माहिती अमरावती : जिल्ह्यात २० ग्रामपंचायतीसाठी निवडणूक आहेत. तर एक बिनविरोध अशी आहे. गोंदिया : जिल्ह्यामध्ये ४ ग्रामपंचायतीमधे सार्वत्रिक निवडणूक तर १० ठिकाणी पोटनिवडणूक पार पडणार आहे. परभणी : जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतच्या सार्वत्रिक तर ७ ठिकाणी पोटनिवडणूक पार पडणार आहे. सिंधुदुर्ग : जिल्ह्यात २४ ग्रामपंचायतींच्या आणि ५२ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका पार पडणार आहे. सांगली : जिल्ह्यातील ९४ ग्रामपंचायत निवडणूक आहेत पैकी ११ ग्रामपंचायती बिनविरोध पार पडणार आहे. पालघर : जिल्ह्यात ५१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका असून ४९ ग्रामपंचायत मध्ये पोटनिवडणूक आहेत. अकोला : जिल्ह्यात ५ नोव्हेंबरला १४ ग्रामपंचायतींची १४ सरपंचपदे आणि १११ सदस्यपदांसाठी सार्वत्रिक निवडणूक आहेत. नांदेड : जिल्ह्यात ग्रामपंचायत निवडणूकित आता पर्यंत पोटनिवडणुकीत ४० सदस्य बिनविरोध निवडून आले आहे तर ३ ग्रामपंचायत या बिनविरोध झाल्या आहे, पोटनिवडणुक आता २५ ग्रामपंचायतमध्ये होणार आहे वर्धा : वर्धामध्ये ६३ ठिकाणी ग्रामपंचायतीमध्ये निवडणूकीसाठी मतदान होईल. ठाणे : भिवंडी - १४ ठिकाणी ग्रामपंचायतीमध्ये निवडणूकीसाठी मतदान होईल. तर मुरबाड तालुक्यात २९ ग्रामपंचायतीचे सार्वत्रिक निवडणूक असून उद्या मतदान होणार आहे. २९ ग्रामपंचायतींपैकी १० ग्रामपंचायत बिनविरोध झाल्या असून १९ ग्रामपंचायत साठी मतदान होणार आहे यवतमाळ : जिल्ह्यातील ३७ ग्रामपंचायतिची सार्वत्रिक निवडणूका होत आहे. यातील ६ ग्रामपंचायतिच्या निवडणूक बिनविरोध मतदान होईल . रायगड : जिल्ह्यातील २१० ग्रामपंचायतिची सार्वत्रिक निवडणूका होत आहे जळगाव : जिल्ह्यात १६७ ग्रामपंचायती साठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून १६ ग्राम पंचायत या बिन विरोध झाल्याने १५१ ग्रामपंचायती आहे. अहमदनगर : जिल्ह्यातील १९४ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आज मतदान होणार असून यातील १६ ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध मतदान होईल पुणे : जिल्ह्यात २३१ ग्रामपंचायत साठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे त्यापैकी ३७ ग्रामपंचायतींची निवडणूक पूर्णपणे बिनविरोध पार पडली. कोल्हापूर : जिल्ह्यात एकूण ८६ ग्रामपंचायतीसाठी निवडणूक होतीय. त्यापैकी ७४ सार्वत्रिक आणि १२ पोट निवडणूक पार पडली रत्नागिरी : जिल्हयातील १४ सार्वत्रिक ग्रामपंचायती, १७१ रिक्त सदस्य पदासाठी,३ थेट सरपंच रिक्त पदांसाठी ५ नोव्हेंबरला मतदान होणार आहे सिंधुदुर्ग : जिल्ह्यात ५ नोव्हेंबरला २४ ग्रामपंचायतींच्या आणि ५२ ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका होत आहेत. जळगाव : जिल्ह्यात १६७ग्राम पंचायती साठी निवडणूकीसाठी मतदान होईल.

# विद्यार्थ्यांनो मेहनतीने कल्पना अस्तित्वात आणून उद्योजगता आत्मसात करा-डॉ.आर.सी.अग्रवाल

**नागपूर । प्रतिनिधी**

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या नाहेप-कास्ट प्रकल्पातंर्गत महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठातर्फे कृषि उद्योजकतेस चालना : आर्थिक विकासाची व्याप्ती आणि संधी या विषयावर दोन दिवसीय विद्यार्थी परिषद आणि प्रशिक्षणाची सुरुवात नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर येथे दि. ५ नोव्हेंबर रोजी झाली. देशभरातील १५० पेक्षा अधिक कृषि आणि पशुविज्ञान विद्यापीठातील पदव्युत्तर विद्यार्थी आणि शिक्षक यात सहभागी झाले आहेत.

परिषदेच्या उद्घाटनाकरीता भाकृअप चे उपनिदेशक डॉ. आर. सी. अग्रवाल हे प्रमुख पाहुणे तसेच ए.एस.आर.बी, नवी दिल्ली चे माजी अध्यक्ष डॉ. सी.डी. मायी, डॉ. पंदेकृवि, अकोला चे कुलगुरु डॉ. शरद गडाख आणि प्रकल्पाच्या राष्ट्रीय समन्वयक डॉ. अनुराधा अग्रवाल हे विशेष अतिथी म्हणुन प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील होते. विद्यापीठाचे संचालक शिक्षण डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक संशोधन आणि कुलसचिव डॉ. नितीन कुरकुरे आणि नाहेप-कास्ट प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक डॉ. आर. जे. झेंडे याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.डॉ. शिरीष उपाध्ये यांनी प्रास्ताविक भाषण केले तसेच विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी विद्यापीठाच्या उपल्ब्धींवर प्रकाश टाकला. डॉ. शरद गडाख यांनी दुग्धव्यवसाय क्षेत्र वाढवण्यासाठी कृषी उद्योजकता आणि पशुसंवर्धनाचे महत्व विषद केले. डॉ. अनुराधा अग्रवाल यांनी नवीन शैक्षणिक धोरणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता




रुजवण्यात आणि कृषी आणि संलग्न क्षेत्रांच्या विकासाला आकार देण्यासाठी नाहेप ची भूमिका स्पष्ट केली.डॉ. सी. डी. मायी यांनी आपल्या भाषणात भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी तयार करण्याकरिता थेयरी आधारित पारंपरिक शिक्षणासोबतच प्रशिक्षणाच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी कृषी, पशुवैद्यकीय आणि मत्स्यपालनासारख्या क्षेत्रांमध्ये स्टार्ट-अप आणि उद्योजकतेसाठी अमर्याद वाव असल्याचे अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. आर.सी. अग्रवाल यांनी उपयुक्त अशी परिषद आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल माफसू चे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी नौकरीच्या मानसिकतेतून बाहेर पडून मनातील कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी कठोर परिश्रम करून उद्योजकता गुण आत्मसात करण्याची हीच योग्य वेळ आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.मत्स्य विद्याशाखेचे अधिष्ठाता आणि संचालक विस्तार शिक्षण डॉ. एस. डब्ल्यू. बोंडे, डेअरी तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. जी. वासनिक, मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. एस. व्ही. गुळवणे, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. ए. पी. सोमकुवार आणि माफसूचे माजी कुलगुरू डॉ. एस.डी. हरणे यांच्यासह अनेक यशस्वी उद्योजक या सोहळ्याकरिता प्रामुख्याने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .